-: प्रेसनोट दिनांक - २३/१२/२०२५ :-

आरोपी लोकसेवक कुलदिप शिवराम जनवाडे, वय - ४७ वर्षे, पद - मंडळ अधिकारी कसबा वाळवे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर रा. १०२३ बी, प्लॉट नंबर २३, ए वार्ड फुलेवाडी रिंगरोड, अरूण सरनाईक नगर, क्रांतीसिंह नाना पाटील चौक, राजर्षी शाहु हायस्कुल मागे कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......

---

तक्रारदार यांचे अर्जुनवाडा येथील स्वत:चे शेती जमीनी त्यांचे नाव ७/१२ पत्रकी लावणे करीता, मंडळ अधिकारी कुलदिप जनवाडे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. तसेच ते पाठपुराव करीत असले त्यांचे चुलत्यांचे व इतर तिन लोकांचे गावठाण मधील भुखंडावर त्यांची नावे ७/१२ पत्रकी नोंद करण्यासाठीही मंडळ अधिकारी जनवाडे हे लाच मागणी करतात म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुळ तक्रारदार यांचे अर्जुनवाडा येथील स्वत:चे शेती जमीन गट क्रमांक मध्ये त्यांचे नाव ७/१२ पत्रकी लावणे करीता, मंडळ अधिकारी कुलदिप जनवाडे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७,०००/- रूपये लाचेची मागणी केली, तसेच तक्रारदार पाठपुरावा करीत असले, मौजे अर्जुनवाड गावठाण मधील इतर गट नंबर मधील भुखंड क्रमांक वरती त्यांचे चुलते यांचे नाव ७/१२ पत्रकी नोंद होणेचे प्रकरण, तसेच गावातील इतर तीन लोकांची भुखंडावरती ७/१२ वरती नाव नोंद करणेकरीता दिलेल्या इतर चार कामासाठी ४०,०००/- रूपये लाच मागणी करून त्यापैकी आता २०,०००/- रूपये दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे एकुण २७,०००/- रूपयांची लाचेची बेकायदेशिरपणे मागणी केल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी मंडळ अधिकारी कुलदिप शिवराम जनवाडे यांनी २७,०००/- रूपये लाच स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक आरोपी लोकसेवक कुलदिप शिवराम जनवाडे, वय - ४७ वर्षे, पद - मंडळ अधिकारी कसबा वाळवे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर रा. १०२३ बी, प्लॉट नंबर २३, ए वार्ड फुलेवाडी रिंगरोड, अरूण सरनाईक नगर, क्रांतीसिंह नाना पाटील चौक, राजर्षी शाहु हायस्कुल मागे कोल्हापूर यांचेविरूध्द राधानगरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री उज्वला भडकमकर पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस उप निरीक्षक प्रकाश भंडारे, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना.सचिन पाटील, पो.कॉ. उदय पाटील, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.